257

क्र• : बीएमआरडीए/एमटीजी/२९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण•
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [ पूर्व], मुंबई – ४०० ०५१•

दिनांक : २५ जुलै १९८३•

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ४ जुलै १९८३ रोजी झालेल्या एकोणतिसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे•

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत कांही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती•

श्र वि आसगांवकर २५/७/८३
[ श्र• वि• आसगांवकर ]
सचिव
कार्यकारी समिती

प्रति :

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी•

No.BMRDA/MTG/29.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th Floor, Bandra(East),
BOMBAY- 400 051.

Date : 25th July, 1983.

The minutes of the 29th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 4th July, 1983 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V. Asgaonkar 25/7/83.
( S.V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

LP:830721:

(259)

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या एकोणतिसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ४ जुलै १९८३ [सोमवार] |
| वेळ | : | सकाळी ११·३० वाजता |
| स्थळ | : | माननीय उपमुख्यमंत्री यांचा समिती कक्ष [ सहावा मजला] मंत्रालय |

उपस्थित सदस्य -

| | | | |
|---|---|---|---|
| १] | श्री· रामराव वा· आदिक<br>उपमुख्यमंत्री आणि नगरविकासमंत्री | - | अध्यक्ष |
| २] | प्रा· नरेंद्र मा· कांबळे<br>गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| ३] | श्री चंद्रकांत त्रिपाठी<br>नगरविकास राज्यमंत्री | - | सदस्य |
| ४] | श्री· मनमोहनसिंग बेदी<br>मुंबईचे महापौर | - | सदस्य |
| ५] | डॉ· सौरभ आर· मजमुंदार<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| ६] | श्री· द· म· सुकथनकर<br>महानगरपालिका आयुक्त<br>मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| ७] | श्री· अेन·आर·रंगनाथन<br>सचिव, महाराष्ट्र शासन<br>नगरविकास विभाग | - | सदस्य |
| ८] | श्री· स·शं· तिनईकर<br>सचिव, महाराष्ट्र शासन<br>गृहनिर्माण आणि विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| ९] | श्री· ल· चं· गुप्ता<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |
| १०] | श्री· अ·ना· बटब्याल<br>महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | - | सदस्य-सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस नगरविकास विभागाचे नूतन सचिव या नात्याने प्रथमच प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित असलेले डॉ· एन·आर·रंगनाथन यांचे अध्यक्षांनी स्वागत केले·

बाब क्र. १ :- मागील [ २८ व्या ] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

प्रस्तुत कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ :- मागील [ २८ व्या ] बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

कार्यवाही अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र. ३ :- वांद्रे - कुर्ला समूहातील भू-खंड " अ " च्या मंजुरीप्राप्त आराखड्यात किरकोळ फेरबदल व भू -खंड " अ " च्या टप्पा २ यांकरिता प्रस्तावित नियोजन प्रस्ताव

विचार विमर्शानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव संमत केला:

ठराव क्र. २२० :-

" असा ठराव करण्यात येत आहे की सन १९६६ चा महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम [ १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ ] चे कलम ४० [१] [क] अंतर्गत वांद्रे-कुर्ला समूहातील विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने प्राधिकरण या द्वारा उक्त अधिनियमाचे कलम ४०[३] व कलम ११३ [अ] [८] व कलम ३७ अन्वये असलेले आपले अधिकार व त्याला याबाबत सहाय्यभूत असलेले सर्व इतर अधिकार वापरुन दिनांक ९ एप्रिल १९७९ ची अधिसूचना क्र. बीकेआर-११७७/२६२-यूडी-५ अन्वये राज्य शासनाने मंजुरी दिलेल्या व आकृती क्र. एच ७८०२१३-अ मध्ये दाखविल्याप्रमाणे सुधारित नियोजन प्रस्तावांना मान्यता देत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की प्राधिकरण उक्त अधिनियमाचे कलम ३० अंतर्गत अधिकार व याबाबत त्याला सहाय्यभूत असलेले इतर अधिकार वापरुन अशा फेरबदलासंबंधात शासकीय राजपत्रात आणि टाइम्स ऑफ इंडिया व लोकसत्ता या दोन स्थानिक वृत्तपत्रांतून जनतेच्या हरकती व सूचना महिन्याहून जास्त नाही इतक्या अवधीत मागविणारी नोटीस प्रसिध्द करण्यास मान्यता देत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण उक्त अधिनियमाचे कलम १३९ अंतर्गत आपले अधिकार व १९७४ चा मुंबई

....३.

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कलम ७[अ] खालील अधिकार वापरुन वरील उपवाक्यांनुसार नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, "अली यावर जंग मूक व बधीर संस्थेला नियम वाटप केलेल्या भू-खंडाच्या क्षेत्रात १.७४ हेक्टरवरुन १.९३ हेक्टर असा फेरफार करण्यास मान्यता देण्यात येत आहे आणि त्यामुळे कन्व्हेन्शनल कॉम्प्लेक्ससाठी असलेल्या भू-खंडाच्या क्षेत्रात तत्सम घट होईल.

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण, उक्त अधिनियमाचे कलम १५१ [३] अंतर्गत आपले अधिकार वापरुन महानगर आयुक्तांस असा निदेश देत आहे की ते अशा हरकती/सूचना सादर करणा-या व्यक्तीचे म्हणणे ऐकून अशा हरकती/सूचनांवर विचार करतील व उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदलासह आपला अहवाल अंतिम मंजुरीसाठी राज्य शासनास सादर करतील.

<u>बाब क्र.४ :</u> <u>१९८२-८३ सालचे प्राधिकरणाचे लेखे व त्यावरील वित्त सल्लागारांचा अहवाल</u>

विचार विमर्शानंतर प्राधिकरणाचे १९८२-८३ सालचे लेखे व त्यावरील वित्त सल्लागारांचा अहवाल प्राधिकरणाने संमत केला.

<u>बाब क्र.५ :</u> <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचारी वर्गाची फेररचना इ. [गोपनीय]</u>

बाब टिप्पणीवर सविस्तर विचारविमर्श करुन त्यात पुढील बदल करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला :

१] पदनामांच्या बदलासंदर्भात पुढील पदनामे खालील दिल्याप्रमाणे बदलावीत असा निर्णय घेण्यात आला.

| प्रस्तावित पदनाम | प्राधिकरणाने निश्चित केलेले पदनाम |
|---|---|
| १] संचालक, नियोजन | प्रमुख, नियोजन विभाग |
| २] संचालक, अभियांत्रिकी प्रकल्प | मुख्य अभियंता, |
| ३] संचालक, विभाग प्रकल्प आणि नियंत्रण | प्रमुख, नगर व क्षेत्रनियोजन विभाग |
| ४] संचालक, वाहतूक व दळणवळण | प्रमुख, वाहतूक व दळणवळण विभाग |

याशिवाय बाकी सर्व पदनामे प्रस्तावित केल्याप्रमाणे संमत करण्यात आली.

२] सध्या अस्तित्वात नसलेल्या [१] सदस्य सचिव, गृहनिर्माण नागरी नुतनीकरण व परिसर विज्ञान मंडळ व [२] सदस्य सचिव, वाहतूक व दळणवळण मंडळ या दोन पदांऐवजी दोन नवीन पदे, परिच्छेद [१] मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या पदनामांत बदल करून निर्माण करण्यास संमति देण्यात आली.

३] चार विभाग प्रमुखांच्या वापरासाठी गाडया ठेवण्याचा आणि त्या गाडया त्यांनी प्राधिकरणाला द.म.रु. १५०/- देऊन खाजगी प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाने मान्य केला नाही. [ त्याऐवजी वित्त सल्लागारानी सुचविल्या प्रमाणे ] यापूर्वी भूतपूर्व कार्यकारी मंडळांच्या अध्यक्षांच्या दिमतीस असलेल्या तीन मोटारगाडया यापुढें प्रशासिक मोटारगाडया समजण्यात याव्यात आणि कार्यालयीन वेळेनंतर त्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सध्या जेथे कार्यालय आहे त्या गृहनिर्माण भवनाच्या आवारात ठेवण्यात याव्यात, असे आदेश प्राधिकरणाने दिले.

४] बाब टिप्पणीच्या परिच्छेद ९ मधील प्रस्तावावर विचारविमर्श करून प्राधिकरणाने तो नामंजूर केला. त्याऐवजी योग्य त्यावेळी महानगर आयुक्तांनी महानगर उपआयुक्तांच्या नियुक्तिसाठी शासनाकडे तसेच कर्मचारीवर्ग अधिका-याच्या नियुक्तिसाठी योग्य त्या अधिका-यांकडे संपर्क साधावा असे आदेश दिले. कार्यकारी समितीच्या सचिवपदी सध्या असलेला अधिकारी दोन पूर्णवेळ अधिका-यांच्या जबाबदा-या सांभाळत असून त्याबद्दल त्यांना त्यांच्या संभवनीय वेतनाच्या २० टक्के इतके जादा वेतन देण्यात येते याची प्राधिकरणाने नोंद घेतली. प्राधिकरणाने असेही आदेश दिले की महानगर आयुक्तांच्या मते जर हा कार्यभार भत्ता सध्याच्या अतिरिक्त प्रभार वाहणा-या अधिका-याच्या बाबतीत योग्य मोबदला नसेल तर त्यांनी प्राधिकरणाला विचारविमर्श करून निर्णय घेण्यास सहायभूत ठरणा-या समर्थनासहित संपूर्ण प्रस्ताव प्राधिकरणापुढे आणावा.

....५

प्राधिकरणाने नंतर पुढील ठराव मंजूर केला -

ठराव क्र. २२१ :-

" असा ठराव करण्यात येत आहे की बाब टिप्पणीचे जोडपत्र - १ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे कर्मचारी वर्गाच्या सहा विभागांच्या पुनर्रचनेस, या कार्यवृत्तात निर्देशित फेरबदलासह, हे प्राधिकरण अनुमति दर्शवित आहे.

ठराव करण्यात येतो की प्राधिकरण याद्वारे [१] बाब टिप्पणीच्या परिच्छेद ४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. २०००-१२५ / २-२५०० या वेतनश्रेणीत नेहमीच्या भत्यांसहित [अ] प्रमुख, नगर व क्षेत्रनियोजन विभाग आणि [ब] प्रमुख, वाहतूक व दळणवळण विभाग या दोन पदांच्या दि. २० मे १९८३ पासून भूतलक्षी निर्मितीस आणि [२] परिच्छेद १० मध्ये प्रस्तावित नेहमीची वेतनश्रेणी व भत्ते यासह एका निम्नश्रेणी लघुलेखकाच्या पदाच्या निर्मितीस मान्यता देत आहे.

ठराव करण्यात येत आहे की बाब टिप्पणीच्या जोडपत्र-२ मध्ये निर्देश केलेल्या पदांची पदनामे जोडपत्रात प्रस्तावित केल्याप्रमाणे तसेच या कार्यवृत्तास निर्देशित फेरबदलासह बदलण्यास हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

ठराव करण्यात येत आहे की वरिष्ठ नागरी नियोजक [ प्रमुख, नियोजन विभाग असे नवे नांव देण्यात आलेल्या ] पदाची वेतनश्रेणी बाब टिप्पणीच्या परिच्छेद ६ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारण्यास व ती दि. ५ जुलै १९८३ पासून कार्यवाहीत आणण्यास प्राधिकरण याद्वारे मंजुरी देत आहे. "

नंतर सभाध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

---------

# MINUTES OF THE TWENTY-NINTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 4th July, 1983 (Monday )

TIME : 11.30 A.M.

PLACE : The Deputy Chief Minister's Committee Room (6th Floor), Mantralaya, Bombay-400 032.

MEMBERS PRESENT :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Shri Ramrao W. Adik, Deputy Chief Minister and Minister for Urban Development. | - | Chairman. |
| 2) | Prof. Narendra M. Kamble, Minister for Housing. | - | Member. |
| 3) | Shri Chandrakant Tripathi, Minister of State for Urban Development. | - | Member. |
| 4) | Shri Manmohansingh H. Bedi, Mayor of Bombay. | - | Member. |
| 5) | Dr. Saurabh R. Majmundar, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - | Member. |
| 6) | Shri D.M. Sukthankar, Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay, Bombay. | - | Member. |
| 7) | Shri N.R. Ranganathan, Secretary to the Government of Maharashtra, Urban Development Department. | - | Member. |
| 8) | Shri S.S. Tinaikar, Secretary to the Govt. of Maharashtra, Housing and Special Assistance Department. | - | Member. |
| 9) | Shri L.C. Gupta, Managing Director, C.I.D.C.O., Bombay. | - | Member. |
| 10) | Shri A.N. Batabyal, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A., Bombay. | - | Member-Secretary. |

At the outset, the Chairman cordially welcomed Shri N.R. Ranganathan, who was attending the Meeting of the Authority for the first time after his appointment as the Secretary, Urban Development Department.

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (28th) Meeting.

The minutes were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the last (28th) Meeting.

The action taken report was noted by the Authority.

Item No.3 : Minor modification to the sanctioned lay-out of Block 'A' and proposed Planning Proposals for Phase II of Block 'A' - Bandra-Kurla Complex.

After discussion, the Authority passed the following Resolution :-

RESOLUTION NO.220 :

"Resolved that the Authority being the Special Planning Authority for the Bandra-Kurla Notified Area appointed under Section 40(1)(c) of the M.R.T.P. Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) do in exercise of its powers under Section 40(3) read with Section 113(A)(8) jointly with Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf, approve of a notice being published to invite objections and suggestions to the planning proposals sanctioned by the State Government under Notification No.BKR-1177/262-UD-5, dated the 9th April, 1979, being modified as shown in Drawing No.H-780213-A on the basis of the directive of the State Government contained in letter, No.BKR-1083/2012-UD-5, dated the 15th June 1983 from the Urban Development Department.

Resolved further that the Authority do in exercise of the powers under Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf approve of a notice being published in the Official Gazette and in two local newspapers being the 'Times of India' and the 'Loksatta' inviting objections and suggestions from the public with respect to such modifications not later than 1 month from the date of such notice.

Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act read with

3/.......

Section 7(A) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

Resolved further that the Authority approve of the modification in the area of the plot allotted to Ali Yawar Jang Institute for deaf and dumb from 1.74 Ha. to 1.93 Ha. and thereby correspondingly reducing the area of the plot for conventional complex.

Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government alongwith proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act."

Item No.4 : Accounts of the Authority for the year 1982-83 and Report of the Financial Adviser thereon.

After discussion, the Accounts of the Authority for the year 1982-83 and Report of the Financial Adviser thereon were approved.

Item No.5 : Reorganisation of staff of the B.M.R.D.A. etc.

The Authority considered the Item note in detail and decided to make the following changes therein :-

(1) As regards changes in designations, it was decided that the following designations should be changed as shown below :-

| Suggested Designations | Designations decided by the Authority |
| --- | --- |
| (1) Director of Planning | Chief, Planning Division |
| (2) Director of Engineering Projects. | Chief Engineer. |
| (3) Director of Development Projects and Control. | Chief, Town and Country Planning Division. |
| (4) Director of Transport and Communications. | Chief, Transport and Communications Division. |

The rest of the designations approved as proposed.

(2) Creation of two posts in lieu of now non-existent posts (1) Member-Secretary, H.U.R.E. Board and (2) Member-Secretary, T. & C. Board were agreed to subject to changes in designations as in (1) above.

(3) The Authority did not agree with the proposal to keep cars at the disposal of the four Chiefs and to allow them private use of the said cars on payment of Rs.150/- p.m. subject to maximum 500 k.m. Instead, they directed that as suggested by the Financial Adviser, the three cars meant for the Chairman of the erstwhile Functional Boards should now be considered as staff cars and these cars be parked in the compound of the Griha Nirman Bhavan where the Office of the Bombay Metropolitan Region Development Authority is located at present.

(4) The Authority considered the submissions made at para 9 of the Item Note but did not agree with the proposal. Instead, they directed that as and when the need is felt, the Metropolitan Commissioner should approach the Government for recruitment of Deputy Metropolitan Commissioner and the appropriate Authority for recruitment of Personnel Officer. The Authority noted that the present incumbent of the Secretary, Executive Committee is discharging the responsibilities of two full time jobs and he was being paid additional remuneration equal to 20% of his presumptive Pay by way of charge allowance. The Authority directed that in case the Metropolitan Commissioner was of the opinion that this charge allowance was not adequate compensation for the present incumbent, he should come with a full proposal to the Authority with the justification for enabling the Authority to consider the matter and decide.

The Authority accordingly, passed the following Resolution :-

RESOLUTION NO.221 :

"Resolved that the Authority hereby approves the reorganisation of staff in 6 Divisions as detailed in Annexure-I to the Item Note, subject to the changes mentioned in these minutes.

5/.......

"2. Resolved that the Authority hereby accords sanction to the creation of (1) the posts of (a) the Chief, Town & Country Planning Division, and (b) the Chief, Transport and Communications Division, in the grade of Rs.2000-125/2-2500 with usual allowances with retrospective effect from 20th May, 1983, as proposed in para 4 of the Item Note and (2) one post of Lower Grade Stenographer in usual grade and allowances as proposed in para 10 thereof.

"3. Resolved that the Authority hereby accords sanction to the designations of various posts mentioned in Annexure-II to the Item Note being changed as proposed in the said Annexure, subject to the changes mentioned in these minutes.

"4. Resolved that the Authority hereby accords sanction to the grade of the post of the Senior Urban Planner (redesignated as the Chief, Planning Division) being revised as proposed in para 6 of the Item Note, effect thereto being given from 5th July 1983."

The Meeting then concluded after a vote of thanks to the Chair.

-=====-

LP:830721: